**ठळक बातम्या**

- इलेक्ट्रिक वाहनांसाठीची टोलमाफीची अंमलबजावणी येत्या आठ दिवसात करावी, असे विधानसभा अध्यक्षांचे शासनाला निर्देश

- गडचिरोलीत ११ नक्षली अतिरेक्यांचं आत्मसमर्पण

- युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश

**आणि**

- मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणाचा मार्ग मोकळा

**<><><><><>**

राज्यात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफ करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी येत्या आठ दिवसात करावी आणि निर्णय लागू केल्यापासून आजपर्यंत वसूल झालेली टोल रक्कम परत करावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले. सर्व संबंधित टोल नाक्यांवर टोल न घेण्याच्या सूचना आठ दिवसात देण्यात याव्यात. अशा वाहनांसाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन वाढवा आणि त्यांच्या क्षमतेत देखील वाढ करा, अशा सूचना अध्यक्षांनी यावेळी दिल्या. याबाबतचा प्रश्न शंकर जगताप यांनी उपस्थित केला होता. त्यावर वरुण सरदेसाई यांनी उपप्रश्न विचारले.

वाढवण बंदर ते समृद्धी महामार्ग दरम्यान होणाऱ्या नवीन रस्त्याची लांबी १८२ किलोमीटर कमी करुन १०४ किलोमीटर इतकी करण्यात येत आहे. अशी माहिती मंत्री दादा भुसे यांनी संबंधित प्रश्नाच्या उत्तरात दिली. हा प्रश्न अजय चौधरी यांनी उपस्थित केला होता, त्यावर मनिषा चौधरी, रईस शेख, योगेश सागर आदींनी उपप्रश्न विचारले.

दारूची दुकानं स्थलांतरित करण्यासाठी संबंधित इमारतीच्या नोंदणीकृत सोसायटीचा ना हरकत दाखला घेणं अनिवार्य राहील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

गेल्या सहा वर्षांत भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या ३० लाखांहून जास्त घटनांची नोंद राज्यात झाली आहे. तर २०२१ ते २०२३ या काळात रेबीजमुळे ३० जणांना आपले प्राण गमवावे लागले, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. स्थानिक पातळीवरच्या संबंधित संस्थांना श्वानांचं निर्बिजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, कल्याण-डोंबिवलीसारख्या प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील प्रभू यांनी प्रश्न विचारला होता.

पुण्यातली वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वारगेट, शनिवारवाडा इथे तीन मार्गिकांचे दोन भुयारी मार्ग तयार करण्याचं काम कुणी करावं यासाठी मुख्यमंत्री लवकरच निर्णायक बैठक घेतील अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचनेद्वारे विचारणा केली होती. राज्यातल्या औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात सुरक्षा उपाययोजना न पाळणाऱ्या उद्योगांवर खटले दाखल केले जातील, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी लक्षवेधीच्या उत्तरात दिली. पुण्यात एका कंपनीत स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेसंदर्भात विधानसभा सदस्य शंकर जगताप, अर्जुन खोतकर, बाबाजी काळे यांनी प्रश्न विचारला होता.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची

असल्याचं लोकलेखा समितीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. ते आज नागपूर विधानभवनात आयोजित संसदीय अभ्यासवर्गात बोलत होते. ‘संसदीय लोकशाहीत सत्तारुढ तसंच विरोधी पक्षाचं स्थान आणि भूमिका’ या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केलं.

विरोधी पक्ष शासनाची चुकीची धोरणं, निर्णय जनतेच्या लक्षात आणून देतो. सत्ताधारी पक्षांसोबत त्यांच्या बरोबरीनं चालणारा विरोधी पक्ष हा प्रगल्भ लोकशाहीचं लक्षण आहे. त्यामुळे विरोधी पक्ष खंबीर, मजबूत असणं आवश्यक आहे, असं वडेट्टीवार म्हणाले.

<><><><><>

विविध गटांच्या ११ जहाल नक्षली अतिरेक्यांनी आज गडचिरोली इथं पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर मिळून ८२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. भामरागड दलमच्या विभागीय समितीच्या दोन सदस्यांचाही यात समावेश आहे. यातल्या काही जणांनी गणवेशात शरण येऊन शस्त्रं खाली ठेवली. यावेळी रश्मी शुक्ला यांनी जहाल नक्षलवादी भूपती याच्या शरणागतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सी-६० कमांडोंचा सत्कार केला आणि त्यांच्या कामगिरीचं कौतुक केलं. तसंच उर्वरित नक्षवाद्यांनाही शस्त्रं टाकून आत्मसमर्पण करायचं आवाहन केलं. गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएफच्या एकत्रित प्रयत्नांमुळे २०१५ पासून आतापर्यंत एकूण ११२ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. शासनाने २००५ पासून जाहीर केलेल्या आत्मसमर्पण योजनेमुळे आणि पोलिस दलानं केलेल्या पुनर्वसनामुळे आजपर्यंत एकूण ७८३ माओवाद्यांनी गडचिरोली पोलिस दलासमोर आत्मसमर्पण केलं आहे.

<><><><><>

मानवाधिकारांच्या जतन आणि संवर्धनासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार

दिनानिमित्त आज नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. माणूसपणाचा हक्क निर्विवाद आणि अबाधित राहिला पाहजे, असं सांगून त्या म्हणाल्या की न्याय्य, समताधारित, आणि संवेदनक्षम समाजव्यवस्था तयार करण्यासाठीची मशागत मानवाधिकार दिवस कार्यक्रमांमधून होत असते. देशात न्याय हा देखील जन्मसिद्ध हक्क असला पाहिजे, असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट...**

**<><><><><>**

दीपावलीचा सण आता मानवतेचा अमूर्त वारसा बनला आहे. युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश करण्यात आला आहे.  युनेस्कोचं २० वं अधिवेशन नवी दिल्लीच्या लालकिल्ल्यात सुरु आहे. त्यात संबंधित समितीच्या बैठकीनंतर हा निर्णय जाहीर झाला. केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. ही बातमी समजल्यावर देशात आणि जगभरातल्या भारतीय समुदायात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. दीपावली हा केवळ सण नाही तर आपल्या संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांशी जोडलेली दृढ भावना असल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर आनंद व्यक्त केला आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनीही या घोषणेबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

यापूर्वी कुंभमेळा, रामलीला, दुर्गापूजा, गरबा अशा १५ भारतीय परंपरांचा तसंच पारंपरिक कौशल्यांचा समावेश या यादीत झाला आहे.

**<><><><><>**

अमृत भारत रेल्वे स्थानक योजने अंतर्गत देशभरात आतापर्यंत १६० रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.  या योजने अंतर्गत एक हजार ३०० स्थानकांचा विकास केला जाईल, असं वैष्णव म्हणाले.

## होल्ड बाईट वैष्णव

**गेल्या** अकरा वर्षांत देशभरात दहा हजार १७० टपाल कार्यालयं उभारण्यात आल्याचं केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशभरात १ लाख ६४ हजार टपाल कार्यालयं आहेत, असं त्यांनी सांगितलं.

**२०३०** पर्यंत १० कोटी टन कोळशापासून इंधन वायू निर्मिती प्रकल्पाचं उद्दिष्ट सरकारने ठेवलं असून यासाठी ८५ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं केंद्रीय कोळसा मंत्री सतीशचंद्र दुबे यांनी लोकसभेत सांगितलं.

**देशाची** धान्य साठवण क्षमता वाढवण्यासाठी जगातला सर्वांत मोठा धान्य साठवण उपक्रम केंद्र सरकारने सुरू केल्याचं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. देशात पहिल्यांदाच सहकारी संस्थांर्फत गोदामं बांधण्यात आली आहेत, साठवण क्षमता वाढल्यामुळे धान्याचं नुकसान कमी होईल, आणि शेतकऱ्यांना याचा लाभ होईल, असं मोहोळ म्हणाले.

**<><><><><>**

अमेरिकेतला मोठा उद्योगसमूह ॲमेझॉननं भारतात २०३० पर्यंत ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीचे  उपाध्यक्ष अमित अगरवाल यांनी आज नवी दिल्लीत आयोजित ॲमेझॉन संभव परिषदेत ही घोषणा केली. विकसित भारताच्या उद्दिष्टांशी ॲमेझॉनची प्रगती सुसंगत असल्याचं सांगून ते म्हणाले की या गुंतवणुकीतून १० लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात क्षमतावाढ, दळणवळण आणि इतर पायाभूत सुविधाविकास, रोजगारनिर्मिती आणि लहान उद्योगांना पाठिंबा ही या गुंतवणुकीची उद्दिष्टं असतील. याआधी मायक्रोसॉफ्टने १७ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

<><><><><>

पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी आरोपी हिरे व्यापारी मेहुल चोकसी याच्या प्रत्यार्पणाला आव्हान देणारी याचिका बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली आहे. यामुळे चोकसीच्या प्रत्यार्पणाच्या कारवाईतला अडथला दूर झाला आहे. भारतात आपला छळ होईल असा दावा चोकसीने याचिकेत केला होता. मात्र इतर कैद्यांप्रमाणेच चोकसीलाही मानवाधिकार संरक्षण मिळेल आणि निःपक्षपाती सुनावणीची संधी मिळेल हा भारतीय यंत्रणांचा युक्तिवाद बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य मानला.

<><><><><>

इंडिगो विमान कंपनीच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही काळापासून निर्माण झालेल्या अनियमिततेबाबत दिल्ली उच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. या अनियमिततेमुळे अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी सरकारनं उचललेली पावलं, वैमानिकांच्या कामाच्या वेळेबाबतचे नियम लागू करण्यात झालेला विलंब आणि इंडिगोच्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीबाबत न्यायालयानं सरकारला प्रश्न विचारले. इतर विमान कंपन्यांनी या परिस्थितीत तिकिटं ४ ते ५ हजारावरून ३० हजार रुपयांपर्यंत नेऊन प्रवाशांना धारेवर धरलं, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

//<><><><><>//